जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे, २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेस व सहा महिन्याच्या मुदतवाढीच्या येणाऱ्या एकुण रक्कम रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.२७/११/२०२५ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती तथा प्रशासक ठराव क्रं.२७७ दि.११/०७/२०२५ मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची ६ महिने मुदत दि.१५/१२/२०२५ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करिता श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना दि.१७/१२/२०२५ ते दि.१५/०६/२०२६ पर्यंत सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रक्कम रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुर्ती नियुक्ती देणेस तसेच मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन-२०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.२१ लक्षची करण्यात आलेल्या तरतूदी अंतर्गत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विशाल सुरेश(राजुमामा) भोळे**

सही/-

(**डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील**)

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिका मालकीच्या कार्यरत वाहनांसाठी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचे मार्फत किरकोळ दरात डिझेल (इंधन) खरेदी करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, मनपा वाहनांसाठी १२००० डिझेल पुरवठा (साठा) करणेबाबत पंप ऑपरेटर यांची मागणी क्रं.१४१२१ दि.०९/१२/२०२५ नुसार डिझेलसाठा ४०२५ लिटर शिल्लक असुन सदर डिझेलसाठा ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

दि.२४/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यात वेळोवेळी पारीत ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.१८/११/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२४ दि.०९/१२/२०२५ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
(**डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील**)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र./रानिआ/मापा-२०२५/प्र.क्र.८०/का-५/मुंबई दि.१५/१२/२०२५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता तसेच म.न.पा. वाहनांसाठी १२००० लिटर डिझेल पुरवठा (साठा) करणेबाबत पंप ऑपरेटर यांनी दि.१९/१२/२०२५ रोजी मागणी दिलेली असुन जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे कामकाज सुरु झाले असून निवडणूक कामी शासकीय अधिग्रहीत वाहने, भाडेतत्वावर लावण्यात आलेली (क्षेत्रिय अधिकारी, FST, SST, VST, VVT, मतदान केंद्रावर कर्मचारी व साहित्य पोहोच करणे, व निवडणूक इतर प्रक्रियेसाठी) वाहनांकरीता पुरेसा डिझेल साठा शिल्लक ठेवणे आवश्यक असल्याने १२,००० लिटर डिझेल खरेदी करणे आवश्यक आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) तफावत झाल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यात वेळोवेळी पारीत ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता १२००० लिटर इंधन (डिझेल) खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२५ दि.१९/१२/२०२५ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लड्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिका प्रशासकीय विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (पेट्रोल) ६००० लिटर खरेदी करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६,३३,००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र./रानिआ/मापा-२०२५/प्र.क्र.८०/का-५/मुंबई दि.१५/१२/२०२५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता तसेच म.न.पा. वाहनांसाठी ६००० लिटर पेट्रोल पुरवठा (साठा) करणेबाबत पंप ऑपरेटर यांनी दि.१९/१२/२०२५ रोजी मागणी दिलेली असुन जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चे कामकाज सुरु झाले असून निवडणूक कामी शासकीय अधिग्रहीत वाहने, भाडेतत्वावर लावण्यात आलेली (क्षेत्रिय अधिकारी, FST, SST, VST, VVT, मतदान केंद्रावर कर्मचारी व साहित्य पोहोच करणे, व निवडणूक इतर प्रक्रियेसाठी) वाहनांकरीता पुरेसा पेट्रोल साठा शिल्लक ठेवणे आवश्यक असल्याने ६००० लिटर पेट्रोल खरेदी करणे आवश्यक आहे.

किरकोळ पेट्रोल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे ६००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात पेट्रोल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ पेट्रोल खरेदी करण्यात वेळोवेळी पारीत ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार किरकोळ स्वरुपात इंधन (पेट्रोल) चा पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन पेट्रोल घेणे सोईचे होईल.

मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता ६००० लिटर इंधन (पेट्रोल) खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२६ दि.१९/१२/२०२५ अन्वये ६००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.६,३३,०००/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लड्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, पंप ऑपरेटर यांचे रिपोर्ट दि.२७/०१/२०२६ नुसार म.न.पा.वाहनांसाठी डिझेलसाठा ३५७२ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांचे दि.२७/०१/२०२६ नुसार १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचे दर प्रती लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.१२/०१/२०२६ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल खरेदी करणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२८ दि.२७/०१/२०२६ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

मनपा पर्यावरण विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी एक्स २५८६ (फॉगर मशिन) दुरुस्ती कामी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.८३,४१४/- मात्रचा कार्यादेश वाहनाचे अधिकृत विक्रेता मे.उज्वल आटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, मनपा पर्यावरण विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी एक्स २५८६ (फॉगर मशिन) बाबत पर्यावरण विभागाकडील अहवालानुसार वाहनाची तांत्रिक तपासणी केली असता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नविन साहित्य (पार्टस) खरेदी करणे आवश्यक आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No. | Particulars | Total Amt. (Incl.Taxes) |
|---|---|---|
| 1) | WIRING HARNESS EGP PIGTAIL BS6-PH2 | 4861 |
| 2) | WIRING HARNESS FRONT CHASSIS BS6-PH2 | 20066 |
| 3) | UREA INJECTOR BS6 | 11725 |
| 4) | NOX SENSOR BS6 | 16752 |
| 5) | CABLE TIE 8.0 X 300 BLACK | 180 |
| 6) | RUSTOFF SPRAY | 380 |
| 7) | WIRING TAPE | 75 |
| 8) | OIL FILTER ELEMENT ASSY BS6 | 1154 |
| 9) | KIT FUEL PRE-FILTER ELEMENT | 956 |
| 10) | ASSY FUEL FILTER DELPHI | 2517 |
| 11) | TMGO SYNTHETIC ENGINE OIL 5 W30 | 3567 |
| 12) | CHECKING ENGINE PERFORMANCE BY DIAGNOSTIC KIT (ONLY FOR BSVI MODELS)RS | 1770 |
| 13) | DPF REGENERATION RS | 590 |
| 14) | REMOVAL AND INSTALLATION OF UREA (AUS-32) INJECTION NOZZLERS | 590 |
| 15) | REMOVAL AND INSTALLATION OF (EGP) AFTERTREATMENT T SCR CATALYST (WITH SCR)RS | 2360 |
| 16) | REPLACEMENT OF WIRING HARNESS. RS | 9440 |
| 17) | REMOVAL/REFITMENT OF NOX SENSOR WITH ECURS | 708 |
| 18) | SPECIAL CHARGE | 1770 |
| 19) | AFTER TREATMENT SYSTEM REPLACEMENT (INCLUDES ART WITING HARMESS R&R, DEF DRAI PEFILL)RS | 2950 |
| 20) | OIL FILTER REPLACEMENT (INCLUDING NEGINE OIL CHANGE) | 413 |
| 21) | FEUL FILTERS | 590 |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे नविन पार्टस्/मजुरीसह खरेदी करणे कामी उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील कोटेशन दि.३०/०१/२०२६ अन्वये रक्कम रु.८३,४१४/- मात्र खर्च अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

मनपा पर्यावरण विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) दुरुस्ती कामी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.३,३५,७१०/- मात्रचा कार्यादेश M/s KAM-AVIDA, Engineers PVT.LTD, Pune यांना देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत पर्यावरण विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ सी एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) हे पर्यावरण विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर रोड स्विपर मशिन करिता नविन पार्टस् मजुरीसह खरेदी करणे मागणी रिपोर्टप्रमाणे तांत्रिकदृष्टया आवश्यक व गरजेचे आहे.

| मा.न.पा.मशिन क्र.एम एच १९ सी.एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे / पाटर्स |
| 1) | Centre Brush 1500 MM -03 Nos |
| 2) | Side Vrush 500 MM (Mix) (Bopnyls00047) -06 Nos |
| 3) | Freight |
| 4) | Main Brush -3 Nos and Side Brush 06 Nos Fitment Charges for Sweeping Machine |
| 5) | Auxiliary Engine Servicing Charges for Sweeper Machine |

वर नमुद मशिनचे वर तक्त्यात नमूद केलेप्रमाणे नविन पार्टस्/मजुरीसह खरेदी करणे कामी M/s KAM-AVIDA, Enviro Engineers PVT.LTD, Pune यांच्याकडील कोटेशन नं.SQ-CSC२५२६-००३६३ दि.१८/११/२०२५ अन्वये रक्कम रु.३,३५,७१०/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नूसार M/s KAM-AVIDA, Enviro Engineers PVT.LTD, Pune यांना रक्कम रु.३,३५,७१०/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-

**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**

**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

मनपा सार्व.बांधकाम विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) दुरुस्ती कामी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.१८,००५/- मात्रचा कार्यादेश वाहनाचे अधिकृत विक्रेता मे.बच्छाव मोटार्स,नशिराबाद,जळगांव यांना देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत पर्यावरण विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ सी एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) हे पर्यावरण विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर रोड स्विपर मशिन करिता नविन पार्टस् मजुरीसह खरेदी करणे मागणी रिपोर्टप्रमाणे तांत्रिकदृष्टया आवश्यक व गरजेचे आहे.

| मा.न.पा.मशिन क्र.एम एच १९ सी.एक्स १२५३ (रोड स्विपर मशिन) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे / पाटर्स |
| 1) | Engine Oil -01 Nos |
| 2) | Diesel Filter -01 Nos |
| 3) | Urea Filter -01 Nos |
| 4) | Hub Gressing - All |
| 5) | SCAN TOOL |

वर नमुद मशिनचे वर तक्त्यात नमूद केलेप्रमाणे नविन पार्टस्/मजुरीसह खरेदी करणे कामी बच्छाव मोटार्स, नशिराबाद, जि.जळगांव यांच्याकडील कोटेशन दि.०६/०३/२०२५ अन्वये रक्कम रु.१८,००५/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नूसार बच्छाव मोटार्स, नशिराबाद, जि.जळगांव यांना रक्कम रु.१८,००५/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विक्रम किसन सोनवणे**

सही/-
(**डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील**)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी वाय ८१९७ (देवदुत) दुरुस्ती कामी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.२,७१,६९२/- मात्रचा कार्यादेश वाहनाचे अधिकृत विक्रेता मे.उषा आटोमोबाईल्स प्रा.लि.जळगांव यांना देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ सी वाय ८१९७ (देवदुत) बाबत प्राप्त अहवालानुसार वाहनाची तांत्रिक तपासणी केली असता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नविन साहित्य (पार्टस) खरेदी करणे आवश्यक आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No. | Particulars |
|---|---|
| 1. | FRONT BUMPER (INJ MOULDED) |
| 2. | FENDER ASSLY RH I BSVI |
| 3. | FENDER SUPPORT UPPER PH TI |
| 4. | HEAD LAMP MTG PAEL RH |
| 5. | BONNET PANEL ASSY TI BSVI |
| 6. | FENDER SUPPORT BOTTOM RH |
| 7. | FRONT GRILL |
| 8. | ASSLY FRONT C/M |
| 9. | SIDE COVER HEAD LAMP RH |
| 10. | HEAD LAMP MTG PANEL REINF |
| 11. | MESH-FRONT BUMPER |
| 12. | CAP-TOE HOOK W/O PAINT |
| 13. | BONNET HINGE ASSY RH |
| 14. | STRIKER FOR BONNET |
| 15. | BONNET LATCH ASSY |
| 16. | BONNET OPENING CABLE (T2) |
| 17. | A POST COVER BOTTOM ASSY RH |
| 18. | ASSLY CORNER COLUMN FRONT |
| 19. | A POST COVER TOP PH (SNOW) |
| 20. | HEAD LAMP ASSY RH WITH |
| 21. | INTERCOOLER (PART OF) |
| 22. | PIPE IC OUT TO THROTTLE |
| 23. | RADIATOR (PART OF) |
| 24. | RADIATOR COWL (PART OF) |
| 25. | AIR DEFLECTOR PH SIDETI FM2 |
| 26. | AIR DEFLECTOR TOP TI 2.6 BSVI |
| 27. | AIR DEFLECTOR BOTTOM TI FM2 |
| 28. | RADIATOR TOP MTG BKT S/A TI |
| 29. | RADIATOR BOTTOM MTG.BKT.RH |
| 30. | VISCOUS FAN ASLY DIA455 FM2.6 |
| 31. | UREA TANK ASLY + SUPPLY |
| 32. | KIT SUPPLY MODULE DENOX |
| 33. | ADBLUE |
| 34. | BODY PAINTING (SELECTED AREA REMOVE OLD PANT SCRUBBING AND REPAINTING) |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाण नविन पार्टस् / मजुरीसह खरेदी करणे कामी उषा ऑटोमोबाईल्स प्रा.लि. जळगाव यांच्याकडील कोटेशन दि.२३/०१/२०२६ अन्वये रक्कम रु.२,७१,६९२/- मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नूसार सदरचे खर्चास तसेच उषा ऑटोमोबाईल्स प्रा.लि. जळगाव यांना रक्कम रु.२,७१,६९२/- मात्रचा कार्यादेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विक्रम किसन सोनवणे**

**सही/-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त, महानगरपालिका, जळगांव.**

मनपा विदयुत विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५६१७ (Tesescopic Hydraulic Ladder) मेजर दुरुस्तीचे काम अधिकृत मॅनीफॅक्चर मे.आवटे फेब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स,पुणे यांचेकडुन करुन घेण्यास व सदर कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.४,१५,०६५/- (सर्व करासह) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका विद्युत विभागाकडील अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेले वाहन क्र.एम एच १९ सी.वाय.५६१७ (Telescopic Hydraulic Ladder) वाहनाची प्रत्यक्ष साईट वर जाऊन तांत्रिक तपासणी केली असता खालील नमूद दुरुस्तीची कामे करणे आवश्यक गरजेचे आहे. सदर वाहनाच्या फ्री सर्व्हिसिंग पूर्ण झाल्या आहेत. आज रोजी सदर वाहनाचा ३४,९४२/- कि.मी. पूर्ण झाले असून सदर वाहन दि.१८/११/२०२५ पासून खालील नमूद कामाअभावी बंद स्थितीत आहे. खालील नमूद केल्याप्रमाणे कामाचे कोटेशन अधिकृत मॅनीफॅक्चर मे. आवटे फेब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे यांच्या मार्फत घेणे आवश्यक आहे.

Mechanical And Electrical Work

१) Four Wheel Hub Greasing
२) All Side Leaf Spring Work
३) Engine Oil to Be Changed
४) Gear Oil to Be Changed
५) DEF Oil to Be Chaged
६) Oil Filter to Be Chaged
७) Diesel Filter To Be Changed
८) Air Cleaner to Be Changed
९) Left Side Head Light to Be Changed
१०) Wipers Check
११) All Indicators to Be Checked
१२) Steering Horn Button to Be Changed
१३) Brake Setting
१४) Steering Oil Leveling
१५) U Clamp and Runner Patta To be Checked
१६) All RTO Passing Work

**Hydraulic Unit Work**

१) Bucket Assembly
२) All Pin & Bush to Be Changed
३) All Hose Pipes to Be Check & Changed As per Requirement
४) Stabilizer Seal Kit/Leakage
५) All Cylinder Overhauling
६) Electrical Work to Be Checked
७) Hydraulic Oil Changed/Top Up
८) PTO Knob To He Checked
९) Drag Chain To be Lubricated
१०) Pressure Gauge to Be Changed
११) All Wiring to Be Checked
१२) Flexible Pipe Cover for Remote Wiring
१३) Bucked Control Pannel To be Changed
१४) All Grease Nipples To be Changed
१५) All Valves to Be Check and Replace as per Requirement
१६) Wire Rope to Be Checked and Work as par Requiremen
१७) Dening Painting as Per Requirement
१८) Rotary Overhauling

वाहन क्र.एम.एच.१९.सी.वाय.५६१७ (Telescopic Hydraulic Ladder) या वाहनावर मागील सहा वर्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र | आर्थिक वर्ष | झालेला खर्च |
|---|---|---|
| १ | २०२०-२१ | २७.९३६/- |
| २ | २०२१-२२ | २१,५५०/- |
| ३ | २०२२-२३ | २,१००/- |
| ४ | २०२३-२४ | ४.६०,८२४/- |
| ५ | २०२४-२५ | ३०,०७०/- |
| ६ | २०२५-२६ | १०,१५६/- |
| | एकूण रक्कम - | ५.५२.६३६/- |

सदर वाहनाचा दि.१८/११/२०२५ रोजी इसलाम मज्जीत चौक, जळगांव येथे वायरमन पोलवर काम करत असताना अपघात होऊन वायरमन यांना किरकोळ दुखापत झाली आहे. विद्युत विभागाकडील अहवालानुसार पथदिवे देखभाल दुरुस्तीचे सर्वच काम ठप्प झाली आहे. तसेच तातडीचे कामे देखील रखडलेली आहेत, विद्युत विभागाच्या कामामध्ये व्यत्यय निर्माण होऊ नये म्हणून विद्युत विभागाकडील वाहन क्र.एम.एच.१९.सी.वाय. ५६१८ कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच दूसरे वाहन तत्काळ जा.क्र./वाव्यवि/१०३/२०२५-२६ दि.२७/११/२०२५ रोजीच्या सहाय्यक आयुक्त (वाहन) यांच्याकडील कार्यालयीन आदेशानुसार वाहन क्र.एम.एच.१९. सी. वाय.५६१७ (Telescopic Hydraulic Ladder) मेजर दुरुस्तीसाठी आवई फेब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे येथे लावण्यात आले आहे. अधिकृत मॅनीफॅक्चर में. आवटे फेब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे यांच्याकडील कोटेशन नं.AW/QO/२५-२६/०८३ दि.१६/११/२०२५ अन्वये रक्कम रुपये ४,१५,०६५/- (अक्षरी रुपये चार लाख पंधराहजार पासष्ट) (सर्व करासह) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मार्गावता अधिकृत मॅनीफॅक्चर में. आवटे फेब्रीकेटर्स & ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे यांच्याकडून वाहनाचे मेजर दुरुस्तीचे काम करुन घेण्यास व रक्कम रुपये ४.१५.०६५/- (अक्षरी रुपये चार लाख पंधरा हजार पासष्ट) (सर्व करासह) मात्र खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लड्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही/-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
मा.आयुक्त महानगरपालिका,जळगांव.

महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेत येत आहे की, पंप ऑपरेटर यांचे रिपोर्ट दि.०२/०३/२०२६ नुसार म.न.पा.वाहनांसाठी डिझेलसाठा ३०७५ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ३ ते ४ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांचे दि.०२/०३/२०२६ नुसार १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.०९/०२/२०२६ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल खरेदी करणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२५-२६/२९ दि.०२/०३/२०२६ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

सही/-
(**डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील**)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
मा.आयुक्त,महानगरपालिका,जळगांव.

सन्मा.अधिकारी व पदाधिकारी यांचे साठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार शासकीय मंजूर दरानूसार वाहने भाड्याने लावणे बाबत.

असा ठराव करणेत येत आहे की,महानगरपालिका प्रशासकीय सेवेत अधिकारी व पदाधिकारी यांचे विभाग/ कार्यालयाकरिता वाहनांची कमतरता असल्याने वाहने उपलब्ध करून देणे वाहन विभागास शक्य होत नाही त्यामुळे प्रशासकीय कामकाजात वाहना अभावी व्यत्यय व अडचण निर्माण होत असल्याने त्याचा विपरीत परिणाम प्रशासकीय कामकाजावर होत असल्याने अधिकारी व पदाधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

सद्यस्थितीत सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, उपायुक्त, (सा.क), प्रमुख वैद्यकीय अधिकारी, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, अग्निशमन अधिकारी, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी (प्र.स ०१ ते ०४) यांना प्रशासकीय कामकाजात गतिमान होण्याच्या दृष्टिकोनातून विविध विभागाच्या कामकाजाची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे त्या कामी वेळोवेळी स्थळ पाहणी, नागरी समस्या सोडवणे कामी, शहरात ठिकठिकाणी भेटी देणे, शासकीय न्यायालयीन कामकाज तसेच विविध प्रकारच्या शासन स्तरावरील योजनांची माहिती व अंमलबजावणी कामी प्रशासकीय कामकाजासाठी वाहनाची नितांत आवश्यकता आहे.

तसेच जळगाव शहरात परिवहन सेवा देखील चार महिन्याच्या कालावधीत सुरू होणार असून परिवहन सभापती यांना देखील वाहन उपलब्ध करून द्यावे लागेल त्या कामी वाहन विभागामार्फत मारुती कंपनीचे डिझायर या प्रकारातील ७ वाहने, बलेनो या प्रकारातील ३ वाहने व उप अभियंता पाणीपुरवठा विभाग यांच्यासाठी बोलेरो वाहन १ नग असे एकूण ११ नग वाहने खरेदी करणे संदर्भात रक्कम रुपये ९१,१६,३७३/- मात्रचा प्रस्ताव आयुक्त यांच्या मान्यतेने महासभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव विभागामार्फत डॉकेट तयार करण्यात आलेले आहे.

परंतु महापौर व स्थायी समिती सभापती यांच्या दालनात सहाय्यक आयुक्त वाहन यांच्या समवेत झालेल्या बैठकीत महानगरपालिकेत सद्यस्थितीत वाहन चालकांची देखील कमतरता असून नवीन वाहने खरेदी करणेस बराच कालावधी लागणार असल्याने नवीन वाहने खरेदी होईपावेतो सुमारे सहा महिने करिता तात्पुरत्या स्वरूपात शासकीय दरानुसार, आवश्यकतेनुसार वाहने भाड्याने लावणे संदर्भात तात्काळ प्रस्ताव ठेवणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापरासाठी वाहनांचे भाडे दर नव्याने निश्चित करण्याबाबत दि.१०/१०/२०२३ रोजीचे दर पत्रकान्वये अनुक्रमांक तीन व पाच मधील नमूद करण्यात आलेल्या विविध प्रकारातील वाहने पदाधिकारी व अधिकारी यांच्याकरिता ११ वाहने १२ तासाकरिता प्रति दिवसानुसार भाड्याने लावणे करिता वाहन प्रकार निहाय रुपये १३००/- अथवा १४००/- रुपये प्रति दिवसानुसार खर्च अपेक्षित आहे त्यानुसार वाहन प्रकार निहाय मासिक अंदाजीत खर्च रुपये ३९००० अथवा ४२००० मात्रचा प्रति वाहन प्रतिमाह अपेक्षित असून रक्कम रुपये ४,२९,०००/- किंवा ४,६२,०००/- मात्रचा प्रतिमाह खर्च अपेक्षित आहे.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील पारित परिपत्रकात नमूद केलेल्या अटी शर्ती नुसार इंधनपुरवठा महापालिकेमार्फत करण्यात येऊन वाहन व वाहन चालक संबंधित एजन्सी मार्फत पुरवण्यात येईल.

